**-: प्रेसनोट :-** **दिनांक - २०/११/२०२३**

## युनानी आयुर्वेदिक डॉक्टर असल्याची बतावणी करुन, लोकांची फसवणुक करणा-या टोळीस गुन्हे शाखा, मुंबई कडून अटक ...

युनानी आयुर्वेदीक उपचार पध्दतीच्या नावांने डॉक्टर असल्याची बतावणी करून नागरिकांच्या घरी येवून, उपचार करण्याच्या बहाण्याने फसवणुकीच्या घटनांची माहिती प्राप्त झाल्यानंतर नमुद प्रकरणांचा तपास गुन्हे शाखा, मुंबई कडून सुरू करण्यात आला.

मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे गु.र.क्र. २३८/२०२३, कलम ४२०,३४ भादवि सह ३३, ३६ महाराष्ट्र वैदयक व्यवसायी अधिनियम १९६१ या गुन्हयाची हकिकत अशी की, दिनांक २६/१०/२०२३ ते दिनांक ३०/१०/२०२३ रोजीचे कालावधीत फिर्यादी श्री. राजेश पाटील, वय ६१ वर्षे (बदललेले नाव), रा.ठि. वडाळा, मुंबई हे नरीमन पॉईट, मुंबई येथे त्यांचे व्यावसायिक कामानिमीत्त असताना, बनावट नावे धारण केलेले सर्व इसम नामे राकेश अग्रवाल वय ४० वर्षे, डॉ. आर.पटेल, वय ५० वर्षे व डॉक्टरांचे सहाय्यक मनिष वय ३५ वर्षे यांचेकडे कोणताही अधिकृत वैदयकिय परवाना नसताना तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सील मध्ये त्यांची नोंदणी नसताना, संगणमताने फिर्यादी यांची फसवणुक करण्याच्या उद्देशाने, ते युनानी आयुर्वेदिक वैदयकिय क्षेत्रातील नामांकित डॉक्टर असल्याचे फिर्यादी यांना भासवून, तसेच त्यांचे अहमदाबाद, गुजरात येथे युनानी आयुर्वेदिक उपचाराकरीता रुग्णालय असल्याचे फिर्यादी यांना खोटे सांगून, त्यांना असलेल्या ट्रेमर (Tremor) या आजारावर खात्रीशीर उपचार करुन त्यांना तात्काळ बरे करण्याबाबत त्यांचा विश्वास संपादीत केला. त्यानंतर डॉक्टर आर. पटेल व त्याचे सहाय्यक यांनी फिर्यादी यांचे वडाळा, मुंबई येथील घरी येवून, त्यांची तपासणी करुन पित्तामुळे त्यांच्या शरीरातील नसा दबल्याचे सांगून, त्यामुळेच फिर्यादी यांचे दोन्ही हात थरथरत असल्याचे सांगितले. त्यानंतर दोन्ही बाजूस छिद्र असलेली मेटल क्युब (तुंबडी) फिर्यादी यांचे दोन्ही हातास व पाठीला लावून, त्याद्वारे रक्त साढून झालेल्या व्रणावर ब्लेडने मार्कीग करुन फिर्यादी यांचे शरीरातील सर्व पित्त शरीराबाहेर काढल्याचे फिर्यादी यांना भासवून, नमूद बनावट वैदयकिय उपचाराकरीता फिर्यादी यांचेकडून रोख रुपये १४,५०,०००/- प्राप्त करुन, फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली, म्हणुन गुन्हा नोंद करण्यात येवून गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, कक्ष-३, मुंबई यांनी सुरु केला.

तपासात गुन्हयातील आरोपी हे राजस्थान राज्यातील असल्याचे व ते मनोर-पालघर, भिवंडी -ठाणे, मालेगांव-नाशिक येथे कळपाने त्याचे इतर साथीदारांसह दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीकरीता, मोकळया मैदानात तंबू लावून कबिल्यात वास्तव्यास असल्याचे समजले. त्याप्रमाणे पोलीस अधिकारी व अंमलदार यांची विविध पथके तयार करुन पाहिजे आरोपींचा शोध सुरु करण्यात आला. तांत्रिक तपासात नमूद आरोपी यांनी त्यांचे वास्तव्याचे ठिकाण वारंवार बदललेले दिसून आले. त्याप्रमाणे गुन्हे शाखा, कक्ष ३ मुंबई च्या पोलीस पथकाने मालेगाव, नाशिक येथे सापळा रचून गुन्हयातील मुख्य आरोपी १) मोहम्मद शेरु शेख मकसुद खॉ उर्फ डॉ.आर.पटेल, वय ४९ वर्षे, २) मोहम्मद नफीस मोह. शरीफ वय ३९ वर्षे, ३) मोहम्मद आसिफ मोह.निसार, वय २७ वर्षे, ४) मोहम्मद अशिफ मोह. शरीफ वय ४४ वर्षे सर्व राहणार राजस्थान यांना शिताफीने अटक केली. आरोपींकडे केलेल्या तपासात त्यांनी गुन्हा करतेवेळी वापरलेले वैदयकिय उपचाराचे सर्व साहित्य, ०९ मोबाईल फोन, सिमकार्डस्, वॅगनार मो/कार व गुन्हयातील फसवणुक झालेली मालमत्ता रु. १४,००,०००/- हस्तगत करण्यात आली आहे. नमूद अटक आरोपी यांनी फिर्यादी यांच्या प्रमाणेच मुंबईत वास्तव्यास असलेल्या इतर ०६ नागरीकांची देखील फसवणुक केल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, सदरबाबत अधिक तपास सुरु आहे. गुन्हे शाखा, मुंबई ने केलेल्या कामगीरीमुळे, नमूद आरोपीकडून नागरीकांच्या भविष्यात होणा-या फसवणुकीस प्रतिबंध करण्यात यश आले आहे.

सदरची यशस्वी कामगीरी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री.विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री.देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मुंबई श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशिकुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) श्री.राज तिलक रौशन व मा. सहा.पोलीस आयुक्त, प्रकटीकरण (मध्य) श्री.दत्तात्रय नाळे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष -३ चे प्रभारी पोलीस निरीक्षक दिपक सुर्वे, सहा. पोलीस निरीक्षक समीर मुजावर, पो.ह. कृतिबास राऊळ, अरूण घाटकर, वैभव गिरकर, सचिन सरवदे, पो.शि. विकास चव्हाण, राहुल पाटील, गोविंद पानखडे, व पो.ह.चालक अनिकेत मोरे यांनी पार पाडली आहे.